<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची चौदावी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**शेतकऱ्यांच्या मालात ५० टक्के नफा मिळेल इतका हमी भाव मिळणेबाबत**

**(१) ३६४६ (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या मालात ५० टक्के नफा मिळेल इतका हमीभाव देण्यात यावा अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ८/११/२०१४ वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या अनक समस्या तातडीने सोडविण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली हे खरे आहे काय, असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०४-२०१५) :**(१) होय.

(२) होय, सदर निवेदनात शेतक-यांच्या अनेक समस्या मांडण्यात आलेल्या असून तयानुषंगाने मागण्या मंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. सदर मागया ह्या कृषी विभागाव्यतिरिक्त उर्जा, पणन, कामगार, वन , मदत व पुनर्वसन या विभागांशी संबंधित असल्याने सदर निवेदनाची प्रत पुढील कार्यवाहीस्तव सर्व संबंधित विभागांना पाठविण्यात आलेली आहे. शेतमाल हमी भावाच्या मागणीसंदर्भात सन्माननीय सदस्यांना उत्तर पाठविण्यात आलेले आहे. कृषी विभागाअंतर्गत पिक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक धोरणानुसार राबविण्यात येते त्याचप्रमाणे कोरडवाहू शेती अभियानांतर्गत अभियानाच्या अंमलबजावणीकरीता आवश्यक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

**नांदेड शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय नविन इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२) ३६९३ (२२-१२-२०१५). श्री. प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी नविन इमारत बांधून त्यांचे उदघाटन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन इमारतीतील आरटीओ कार्यालय अद्यापही स्थलांतरीत झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नविन इमारतीत आरटीओ कार्यालय स्थलांतरीत न होण्याची कारणे काय आहे, व नविन इमारतीतील सदर कार्यालय केव्हा स्थलांतरित होणार आहे?

**श्री. दिवाकर रावते (२०-०४-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड या कार्यालयासाठी बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीतील अंतर्गत फर्निचरचे काम अपूर्ण असल्याने सदर इमारतीमध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थलांतरीत करता आलेले नाही. सदर काम पूर्ण होताच स्थलांतराची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील शाळांमधून विद्यार्थ्यांना खिचडी पुरविण्यासाठी देण्यात येणारे अनुदान उपलब्ध न झाल्याबाबत

**(३) ३७०४ (२२-१२-२०१४). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमधून इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवी मधील विद्यार्थ्यांना खिचडी पुरविण्यासाठी इंधन आणि भाजीपाल्यासाठी माहे जून ते नोव्हेंबर या कालावधीकरिता निम्मे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित अनुदान उपलब्ध न झाल्यास दुसऱ्या शैक्षणिक सत्रापासून विद्यार्थ्यांना खिचडी देणे शक्य होणार नाही ही बाब संबंधितांनी शिक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित अनुदान त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२८-०४-२०१५) :** (१) व (२) दिनांक ५/४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये ऑगस्ट, २०१४ पर्यंतचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. यानंतर दिनांक २७/११/२०१४ च्या शासन निर्णयान्वये ऑक्टोबर, २०१४ पर्यंतचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) व (४) दिनांक ५/२/२०१५ रोजी उर्वरित अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

---

**मुंबई मधील कांदिवली (पूर्व) येथे अनधिकृत बांधकामे व व्यवसाय चालू असल्याबाबत.**

**(४) ३७१२ (२३-१२-२०१४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील वेस्टर्न हायवे वरील कांदिवली (पूर्व) समता नगर पोलीस ठाणे ते टाईम्स ऑफ इंडिया इमारत कांदिवली (पूर्व) च्या मंत्रालयाच्या दिशेने जाताना डाव्या बाजूने अनधिकृत बांधकामे/व्यवसाय सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हायवेच्या बाजूची जागा कोणाच्या मालकीची आहे,

(३) असल्यास, संबंधीत विभागाकडे अनधिकृत बांधकाम व व्यवसायाबाबत तक्रारी आल्या आहेत काय,

(४) असल्यास, संबंधीत प्रशासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०४-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) सदर जागा रस्त्याच्या मध्यापासून दुतर्फा ३०.५० मीटर शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची आहे.

(३) होय.

(४) सदरची अतिक्रमणे दि.२३.२.२०१५ व दि.५.३.२०१५ रोजी काढण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपगरातील बोरिवली येथील नॅशलन पार्क हायवेवर अवैध वाहतूक पार्कींग, वेश्या व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(५) ३७३७ (१५-०१-२०१५). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपगरातील बोरिवली येथील नॅशलन पार्क हायवेवर खाजगी प्रवासी बसेस पार्क करतात त्यांचे वाहनचालक वाहक तेथेच राहतात त्यांचे प्रातः विधी ही तेथेच करत असल्याने या परिसरात दुर्गंधी होते, तसेच गदुर्ले, व वेश्या व्यवसायही या भागात चालतो, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१५) :**(१) व (२) असे निदर्शनास आलेले नाही.तथापि, बोरिवली स्टेशनकडून संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यानाकडे जाणारा रस्ता अरुंद असून या मार्गावर सुकुरवाडी

एस.टी महामंडळाचे बस स्थानक आहे. या मार्गावरील चौकामध्ये पुलाखाली खाजगी ट्रॅव्हल्स बस बुकिंगची २०-२५ कार्यालये आहेत. या ठिकाणी प्रवाशांना घेण्याकरिता बसेस काही वेळ थांबतात. बसेस वाहतूकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण न करता जास्त वेळ उभ्या राहणार नाहीत याबाबत काटेकोर दक्षता घेण्याबाबत संबंधितांना आदेशित करण्यात आले आहे.

नॅशनल पार्क परिसरात अनधिकृत पार्किंग करणाऱ्या ३४८ वाहनांवर वाहतूक पोलीसांनी कारवाई केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येलदरी-सेनगांव-फाळेगांव (जि.हिंगोली) रस्त्यावरील पुलाची कामे अपुर्ण असल्याबाबत**

**(६) ३७४२ (२३-०२-२०१४). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलदरी-सेनगांव -फाळेगांव (जि.हिंगोली) रस्त्यावरील पुलाची कामे अर्धवट अवस्थेत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर कामे पूर्ण करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू रस्त्यावरील पुलाची कामे किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०५-२०१५) :** (१) होय.

(२) निधी अभावी काम बंद आहे.

(३) व (४) सदरील काम निधी उपलब्धतेनुसार दि.३१/१२/२०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**हिंगोली ते कनेरगांव (नाका) जि.हिंगोली या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(७) ३७४५ (२२-१२-२०१४). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली ते कनेरगांव (नाका) जि.हिंगोली या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांवर आतापर्यंत लाखो रुपये खर्च होऊन सुध्दा अद्यापही रस्ता दुरुस्त न होता रस्त्यावर मोठया प्रमाणावर खड्डे पडले आहेत व वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर लाखो रुपये खर्च होऊनही सदर रस्त्याची अत्यंत दुरवस्था होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी योग्य होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१५) :**१,२,३ व ४ विषयाधीन रस्ता दि. २३/२/२०१४ रोजी राष्ट्रीय महामार्ग घोषित झाल्यानंतर दि.१/१०/२०१४ रोजी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला. हस्तांतरणाच्या प्रक्रीयेमध्ये रस्त्याची देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. सद्य:स्थितीत रस्त्यात पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात येत आहे.

---

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करुन हिंगोली जिल्हयाकरीता स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती बँकेची निर्मिती करण्याबाबत

**(८) ३७४६ (२२-१२-२०१४). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयाचे विभाजन होऊन स्वतंत्र हिंगोली जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतरही परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करुन हिंगोली जिल्हयाकरीता स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती बँकेची निर्मिती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार हिंगोली जिल्हयाकरीता स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व हिंगोली जिल्हयात स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती बँकेची निर्मिती करण्याकरिता किती कालावधी लागण्याची शक्यता आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे काय,
(२) दि.परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करणेबाबत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या दि. २१.७.२००८ पत्रान्वये सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता, परंतू नाबार्डने दि.०५.०३.२००९ च्या पत्रान्वये परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन विभाजनाचा प्रस्ताव विचारात घेता येत नाही, असे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**हिंगोली जिल्हा परिषदेतंर्गत अनेक नळ पाणी पुरवठ्याच्या योजना अपूर्ण असल्याबाबत**

**(९) ३७४८ (१५-०१-२०१५). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेंतर्गत भारत निर्माण, जलस्वराज्य व इतर योजनांतर्गत अनेक नळ पाणी पुरवठ्याच्या योजना अपूर्ण आहेत व त्यामुळे संबंधित गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळ पाणी पुरवठा योजना पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०३-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) हिंगोली जिल्हा परिषदेअंतर्गत २३७ गावांची कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी १९७ योजनेची कामे पूर्ण करुन पाणीपुरवठा चालू करण्यात आला आहे. संभाव्य पाणी टंचाई भासणाऱ्या गावांमध्ये पिण्याच्या पाणी टंचाई निवारण्याच्या उपाययोजना प्रस्तावित आहेत. सदर अपूर्ण नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी पंचायती समिती स्तरावर बैठका घेऊन योजना पूर्ण करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज उपविभागातील गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यातील शेतक-यांना कृषीपंपासाठी वीज कनेक्शन देण्याबाबत.**

**(१०) ३७७२ (२२-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज उपविभागातील गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यातील सुमारे एक हजारांवर शेतक-यांनी कृषीपंपासाठी लागणारी अनामत रक्कम भरुन एक वर्षाचा काळ ओलांडून देखील वीज कनेक्शन देण्यात आली नाहीत हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर शेतक-याचे कृषी पंपाना तातडीने विद्युत पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) शेती पंपाच्या नवीन वीज जोडणीसाठी पैसे भरून प्रलंबीत असणा-या शेतक-यांसाठी उच्चदाब व लघुदाब वाहिनी, नवीन वितरण रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) इत्यादी कामे महावितरणच्या इन्फ्रा - २ या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत व जेष्ठता यादीनुसार शेती पंपाना वीजपुरवठा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील ऊर्जा विभागाच्या इन्फ्रा आराखड्याच्या कामाची सद्य:स्थिती

**(११) ३८३१ (२२-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात शासनाने ऊर्जा विभागात सुरु केलेल्या अहमदनगर इन्फ्रा आराखडा मंजूर होऊन वर्ष लोटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागात अद्याप नवीन सबस्टेशन, नवीन ट्रान्सफार्मन्सेस, नवीन विद्युत कनेक्शनचे काम झालेले नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इन्फ्रा आराखडयाचे काम अद्याप पूर्ण का करण्यात आले नाही,

(४) असल्यास, सदर कामाच्या ठेकेदाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार शासन पुढे कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पायाभूत आराखडा - २ अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर शहर, ग्रामीण, श्रीरामपूर, संगमनेर व कर्जत ह्या ५ विभागासाठी ई-टेंडरद्वारे कामे डिसेंबर २०१३ व तद्नंतर प्रदान करण्यात आलेली आहेत. सदर कामाचा कालावधी दोन वर्षाचा आहे. सदर कामे कंत्राटदारामार्फत मंदगतीने सुरू होती. त्यासाठी सदर कंत्राटदाराला कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) होय.

(५) सदर कामे कंत्राटदारामार्फत मंदगतीने सुरू असल्याने संबंधितांना कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सूचना (Notice to correct) देण्यात आलेली आहे.

---

## जवाहरनगर (भंडारा) राजे दहेगाव क्षेत्रातील १५८.१९ हे आर क्षेत्रातील खरिप पिकांना पाणी न मिळाल्याने धान पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१२) ३९०२ (२३-१२-२०१४). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरनगर (भंडारा) राजे दहेगाव क्षेत्रातील १५८.१९ हे. आर क्षेत्रातील खरिप पिकांना पाणी मिळाले नाही. परिणामी हातात आलेल्या धान्यपिकाचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पिकाचे नुकसान भरपाई मिळावे या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,माजी सभापती व विद्यमान पंचायत समिती सदस्य जितेन्द्र चवरे यांच्या सह १९५ शेतक-यांचे सह्यांचे निवेदन देण्यात आले आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०४-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

मौजा राजेगाव दहेगाव येथील एकूण १५८.१९ हे.आर क्षेत्रापैकी ७८.०५ हे. आर क्षेत्रातील खरीप पिकांना सिंचन करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्राला प्रथम पाळीच्या पाण्याव्यतिरीक्त सिंचन होऊ शकले नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) महसूल विभागाकडून राजे दहेगांव क्षेत्रात ६ पीक कापणी प्रयोग घेण्यात आले. त्यानुसार राज दहेगांव येथील खरीप हंगामातील अंतीम पैसेवारी ४५ पैसे आल्यामुळे मौजा-राजे दहेगांव येथील एकूण बाधी ३६१ शेतक-यांना (बाधीत क्षेत्र २९०.०० हेक्टर आर) शासन निर्णय दि.०७.०१.२०१५ नुसार रु.२२,१८,३००/- आर्थिक मदत वाटपाची कार्यवाही महसूल विभागाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे शिराळा (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील ट्रान्सफॉर्मरचे कामाबाबत**

**(१३) ३९०५ (१५-०१-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिराळा (ता.परांडा जि.उस्मानाबाद) ३३ के.व्ही.स्टेशनवर वाढीव ५ एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर मंजूर असताना ठेकेदाराने वाढीव ट्रान्सफॉर्मरचे काम केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) मौजे शिराळा ता.परांडा जि. उस्मानाबाद येथील ३३ के.व्ही. सबस्टेशनवर वाढीव ५ एमव्हीए चा ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला होता. सदर काम पूर्ण करून दि १९.०१.२०१५ रोजी वाढीव ५ एमव्हीए चा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे घाटनांदूर (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील महाराष्ट्र विद्युत मंडळातर्फे करण्यात आलेले सिंगल फेजचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१४) ३९०६ (१५-०१-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटनांदूर (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे करण्यात आलेले सिंगल फेजचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर काम दर्जेदार व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) नवीन वाहीनीचे काही पीन इन्सुलेटर कमी गुणवत्तेची असल्याने फिडर वारंवार ट्रीप होत होते तसेच फिडरचा विद्युत भार १७० ॲम्पीअर वर गेल्याने उभारण्यात आलेल्या वाहिनीचे कंडक्टरची क्षमता अपुरी पडत होती. त्यामुळे सुरूवातीचे ३ कि.मी. पर्यंतच कंडक्टर कंत्राटदारांकडून विनामुल्य टाकण्यात आला व खराब pin insulator विनामुल्य बदलण्यात आले. त्यानंतर वारंवार ट्रिपींगच्या घटना बंद झाल्या. असल्याचे चौकशीअंती आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परांडा, भूम वाशी तालुक्यात (जि.उस्मानाबाद) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची कामे विहीत वेळेत पूर्ण झाली नसल्याबाबत

**(१५) ३९०७ (१५-०१-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा, भूम वाशी तालुक्यात (जि.उस्मानाबाद) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची कामे विहीत वेळेत पूर्ण झाली नसल्याबाबतच्या अनेक तक्रारी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री आदिकडे स्थानिक लोकप्रितिनिधींनी अनेकदा केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) पायाभूत विकास योजना - १ गावठाण फिडर सेपरेशन व सिंगल फेजींगची कामे कंत्राटदारांकडून विलंबाने केली असल्याने निविदेच्या अटी व शर्तीनुसार संबंधित ठेकेदारास दंड आकारण्यात आला आहे. तसेच उर्वरित कामाचा पाठपुरवा करून सदर कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत. पायाभूत विकास योजना - २ अंतर्गतची कामे कालावधी फेब्रुवारी, २०१६ पर्यंत आहे व त्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पांढरेवाडी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील साठवण तलावामधील विद्युत लाईन शिफ्टींगची कामे मजूर संस्थेला दिल्याबाबत**

**(१६) ३९०८ (१५-०१-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पांढरेवाडी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील साठवण तलावामधील बुडीत क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनीची लाईन शिफ्टींगची कामे विद्युत ठेकेदाराला न देता मजूर संस्थेला देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार लाईन शिफ्टींगची कामे मजूर संस्थेला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) मौजे पांढरेवाडी, ता.परांडा येथील साठवण तलावामधील बुडीत क्षेत्रातील म.रा.वि.वि. कंपनीची विद्युत वाहिनी स्थलांतर DDF योजने अंतर्गत मंजूर करण्यात आले आहे. महावितरणतर्फे केवळ कामाचे सुपरव्हीजन करण्यात येते. सदरील काम संबंधीत संस्था / प्राधिकरण / ग्राहक यांनी ठेकेदाराकडून लागणा-या सामानासह करून घ्यावयाचे असते. पांढरेवाडी येथील विद्युत आराखडा स्थलांतरो काम मजूर संस्थेमार्फेत मे.आर.आर. इंटरप्रायजेस या मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे. सदर कामाची देखरेख महावितरणतर्फे करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे ईला-जवळा (जि.उस्मानाबाद) येथे म.रा.वि.वि.कंपनीने ३३ के.व्ही.चे सबस्टेशन उभारण्याची मागणी**

**(१७) ३९०९ (२३-१२-२०१४). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ईला-जवळा (जि.उस्मानाबाद) येथे म.रा.वि.वि.कंपनीने ३३ के.व्ही.चे सबस्टेशन उभारण्याची मागणी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक नागरीकांकडून सातत्याने येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.
(२) सदर कामाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून सदर ठिकाणी ३३ के.व्ही. आंतरगांव येथील उपकेद्रातून ११ के.व्ही आंतरगांव फिडरवरून वीज पुरवठा करण्यात येतो. फिडर विभाजन करण्यासाठी अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असून सदर काम पायाभूत आराखडा २ (इन्फ्रा-२) योजनेअंतर्गत करण्यासाठी ठेकेदारास कार्यादेश दिला असून सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) ग्रामिण पाणीपूरवठा उप विभागाअंतर्गत**
**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना मंजुरी प्रदान करण्याबाबत**

**(१८) ३९४६ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) ग्रामिण पाणीपुरवठा उप विभागाअंतर्गत ओ.डी.एफ. ची टक्केवारी कमी असल्याने निधी अप्राप्त असल्याच्या कारणावरून ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांअभावी पिण्याची सोय नसल्याने गावांमध्ये पिण्याचे पाण्यासाठी पर्यायी सोय उपलब्ध करण्यात आलेली आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०३-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
चिमुर (जि.चंद्रपूर) उपविभागा अंतर्गत ओ.डी.एफ. टक्केवारी कमी असल्याचे कारणावरून १५ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली नाही.
(२) होय.
योजना अभावी पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या गावामध्ये अस्तीत्वातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत उदा . सार्वजनिक/खाजगी विहिरी, हातपंप यादवारे पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था गावात उपलब्ध आहे. तसेच वरील १५ पैकी ७ गावात नळ योजना आहे.
(३) व (४) प्रस्तावीत १५ नळ योजनांना गावात शौचालयाची टक्केवारी वाढविण्याकरीता स्वच्छ भारत अभियान तर्फे ग्रामपंचायत स्तरावरून गावामध्ये शौचालय वाढविण्याकरिता, जिल्हा परिषद स्तरावरून मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येत असून शौचालय बांधकाम वाढविण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

---

**करमाळा (जि.सोलापूर) येथे “महावितरण आले आपल्या दारी”**
**या योजनेंतर्गत लाभापासून वंचित ग्राहकांच्या बाबत**

**(१९) ३९६४ (१५-०१-२०१५). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) मतदार संघात “महावितरण आले आपल्या दारी” ही योजना २०१० ते २०१२ पर्यंत राबवली गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत २०१० साली सहभागी होऊनही अद्यापपर्यन्त वीज ग्राहक लाभापासून वंचित राहीले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीजग्राहकांना लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) ''महावितरण आले आपल्या दारी'' या योजनेचा लाभ घेतलेल्या सर्व ग्राहकांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आला आहे. तथापी काही ग्राहकांन पोल व लघुदाब वाहिनी उभी करून रीतसर वीज पुरवठा करण्याचे काम पायाभूत सुविधा आराखडा - २ अंतर्गत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाहूर ते मुलुंड (मुंबई) येथील मार्गावरील नाहुर स्टेशनचा उड्डाणपुल अरुंद असल्याबाबत**

**(२०) ३९९९ (२३-१२-२०१४). श्री. सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाहूर ते मुलुंड (मुंबई) येथील मार्गावरील नाहुर स्टेशनचा उड्डाणपुल अरुंद असल्याने दोन ते तीन तास ट्राफीक जाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाहुर स्टेशनचा उड्डाणपुल रुंद करण्यासाठी मुंबई महानगरपालिका व भारतीय रेल्वे एकमेकांची जबाबदारी दाखवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाहुर स्टेशनचा मुलुंडकडे जाणारा उड्डाणपुल रुंद करण्याची जबाबदारी निश्चित कोणाची आहे,

(४) असल्यास, उड्डाणपुलाचे रुंद करण्याचे कामकाज केव्हा होणार,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर पुलाचे रुंदीकरण करण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रशासन भारतीय रेल्वे प्रशासनाबरोबर योग्य समन्वय साधून आहे.

(३) नाहुर स्टेशनचा मुलुंडकडे जाणारा उड्डाणपुल रुंद करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे.

(४) व (५) सदर उड्डाणपुल रुंद करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागारांची नेमणूक केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे नियुक्त केलेल्या सल्लागाराने संकल्पचित्रे व अंदाजपत्रके सादर केले असून, सदर काम प्रस्तावित गोरेगांव व मुलुंड जोड रस्त्याच्या कामात अंतर्भूत करण्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

---

## राज्यात मनोरुग्णालयांची संख्या अपुरी असलेबाबत

**(२१) ४०७८ (२३-१२-२०१४). श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मनोरुग्णांची संख्या वाढली असून त्यांना रुग्णालयात दाखल करुन तातडीने उपचार देणे गरजेचे आहे मात्र मनोरुग्णालये कमी असल्याने रुग्ण उपाचारांपासून वंचित राहतात, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे मनोरुग्णालयांची संख्या वाढवणे आवश्यक असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णांना वेळीच उपचार मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :**(१), (२) व (३) राज्यात पुणे , नागपूर, ठाणे व रत्नागिरी येथे चार प्रादेशिक मनोरुग्णाचे कार्यरत असून तेथे रुग्णांना उपचार दिले जातात. या प्रादेशिक मनोरुग्णालयांमधे १.०४.२०१४ ते ३१.१२.२०१४ अखेरपर्यंत ४२२६ आंतररुग्ण व १०७५२१ बाहयरुग्णांना उपचार देण्यात आले आहे जिल्हा रुग्णाल्यांमध्ये मनोविकृती कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्यातील बारा जिल्ह्यामध्येही रुग्णांना उपचार दिले जातात. या बारा जिल्हांमध्ये डिसेंबर, २०१४ अखरेपर्यंत ४२६८ आंतररुग्ण व ६४८४२ बाहयरुग्णांना उपचार देण्यात आले आहेत. (या मनोरुग्णांमध्ये उपचार देण्यात आलेल्या रुग्णांच्या आकडेवारीचा तक्ता सोबत जोडला आहे.)

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**प्रादेशिक मनोरुग्णालयातील आंतररुग्ण व बाहयरुग्ण मनोरुग्णांना माहे एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ पर्यंतची आकडेवारी**

| | पुणे | | ठाणे | | नागपूर | | रत्नागिरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०१४ पर्यंत | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण | आंतररुग्ण | बाहयरुग्ण |
| | १४०२ | २७०६९ | १५२६ | ३०८७१ | ३४१ | ३६५०७ | ९५७ | १३१०४ | ४२२६ | १०७५२१ |

जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमातील (डिएमएचपी) बारा जिल्हे.

| अ.क्र. | जिल्हे | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण |
|---|---|---|---|
| १ | रायगड | २०५ | ३६४६ |
| २ | जळगांव | १५५ | ८१३२ |
| ३ | सातारा | १९१ | ८८८० |
| ४ | परभणी | १३० | ८१३९ |
| ५ | बुलढाणा | १८९ | १९५९ |
| ६ | अमरावती | ७५७ | ५८६१ |
| ७ | नाशिक | १४६ | ८४११ |
| ८ | वर्धा | ९३१ | १५३१ |
| ९ | भंडारा | ६१० | ६७५२ |
| १० | गडचिरोली | ५६४ | ८७७ |
| ११ | अहमदनगर | ३९० | ७७८३ |
| १२ | उस्मानाबाद | ० | २८७१ |
| एकुण बेरीज | | ४२६८ | ६४८४२ |

---

**मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत मुंबई विद्यापीठ उपकेंद्र मंजूर जागेवर बांधकाम करण्याबाबत**

**(२२) ४०८५ (२२-१२-२०१४). श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत मुंबई विद्यापीठ उपकेंद्र मंजूर करण्यात आलेले असतानाही सदर जागेवर अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठाच्या मुंबई विद्यापीठ उपकेंद्रास निधीची तरतूद करण्यासह सदरील उपकेंद्राचे त्वरीत बांधकाम सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर विद्यापीठाचे उपकेंद्र पूर्ण क्षमतेने सुरु होण्याकरिता किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथिल उपकेंद्राच्या बांधकामास माहे सप्टेंबर, २०१४ पासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आलेली आहे.

(२) मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथील उपकेंद्राच्या बांधकामास विद्यापीठ फंडातून सन २०१४-१५ या वर्षात रु. ७.१९ कोटी तरतूद करण्यात आली असून सन २०१५-१६ या वर्षात रु. १० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) कल्याण येथिल उपकेंद्राचे बांधकाम दोन टप्प्यात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून संपूर्ण इमारत तळमजला+पाच (G+५) मजल्याचे असून पहिल्या टप्प्यात तळमजला + (G+१) अशा मुख्य इमारतीचे काम सूरु करण्यात आलेले आहे व रु.१७,१९,८०,०९९.३४ इतक्या रकमेची Work Order देण्यात आलेली आहे व जुलै २०१५ पासून अभ्यासक्रम सुरु करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अनेक जिल्हयात मोठ्या प्रमाणात अनधिकृत वीजवापर होत असल्याबाबत.**

**(२३) ४११९ (१५-०१-२०५०). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्हयात मोठ्या प्रमाणात अनधिकृत वीजवापर होत असल्याचा प्रकार माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनधिकृतपणे होत असलेली वीजवापर रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :**(१) नाही.

(२) राज्यात कायम स्वरुपी ४२ फिरते पथक विभागीय पातळीवर एकूण १२० विशेष पथके नियमितपणे विद्युत संचाची तपासणी करुन विद्युत संचातील अनियमितता व वीजचोरीचे प्रकार शोधून काढण्यासाठी कार्यरत आहेत. वीज चोरी प्रकरणात वीज बील निर्धारण करताना वीज दराच्या दिडपट इतक्या दराने आकार निर्धारण करण्यात येते.

तसेच प्रविभागीय/विभागीय/उपविभागीय पातळीवर एनर्जी ऑडीट करण्यात येते. निर्धारित नॉर्मल लॉसेस पेक्षा जास्त लॉस असल्याचे आढळून आल्यास सबंधित विभागातील ग्राहकांची कसून तपासणी करण्यात येते. ग्राहकांची मिटर बॉक्स व मिटर टर्मिनलला सुरक्षा मोहर लावले जातात ज्यामुळे मिटर बॉक्स उघडता येत नाही. तसेच ग्राहकांच्या मिटरला ज्या सी.टी.द्वारे व्दितीय बाजूस वीज पुरवठा दिला जातो त्या सर्व भागस वेल्ड केले जाते.

आधुनिक प्रकारची इलेक्ट्रॉनिक मिटर्स वापरण्यात येत असून, ह्या मिटरमध्ये ४५ ते ६० दिवसाची मागील संपुर्ण माहिती व वीज वापर अथवा ग्राहकाने लबाडीच्या उद्देशानेही काही

फेरफार केला असल्यास त्याची नोंद होते. त्याप्रमाणे बिल मागता येते. उच्चदाब ग्राहक सी.टी.पी.टी. पासून मिटरपर्यंत जाणा-या वीज प्रवाहात गैरप्रकार करता येऊ नये म्हणून किऑक्स पध्दतीच्या मिटर्स सिस्टीमचा वापर सुरू आहे. वीज चोरीस आळा घालून त्यावर कायदेशीर कारवाई त्वरीत होण्यासाठी महाराष्ट्रात विशेष न्यायालये व विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यात आली आहेत. वीज चोरीच्या प्रकरणामध्ये केवळ ग्राहकाविरुध्द कारवाई केली जाते असे नव्हे तर महावितरण कंपनीच्या कर्मचारी/अधिका-यांविरुध्दही प्रचलित कायद्यातील तरतुदीप्रमाणे तसेच महावितरणच्या कर्मचारी सेवाविनियमास अनुसरून योग्य ती कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप येथील डोंगराळ भागात बांधलेल्या सरंक्षण भिंतीचा पाया कमजोर होऊन भींत कोसळून मोठी दुर्घटना होण्याचा धोका निर्माण झाला असल्याबाबत**

**(२४) ४१२६ (२३-१२-२०१४). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डोंगराळ भागातील वस्त्यांवर पावसाळ्यात दरड कोसळून दुर्घटना होण्याचे प्रकार वाढत असतानाच भांडूप येथील डोंगराळ भागात बांधलेल्या सरंक्षण भिंतीचा पाया कमजोर होऊन भींत कोसळून मोठी दुर्घटना होण्याचा धोका वाढला असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भिंतींची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता (०७-०४-२०१५) :**(१) हे खरे नाही.

संरक्षण भिंतीचा पाया कमजोर झालेला नाही. भिंतीचे बांधकाम माहे ऑगस्ट मध्ये प्रगतीपथावर होते. तथापि, पावसाच्या पाण्याने डोंगरावरील माती खाली घसरल्याचे दिसून आले आहे. ही बाब भूमापकाने केलेल्या पंचनाम्यात नमूद केलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, न.भू.क्र. ४ अ/१अ (पै) या ठिकाणी घोषित गलिच्छ वस्तीमध्ये संरक्षण भिंतीची बांधकाम योजना सन २०१४-२०१५ अंतर्गत संरक्षण भिंतीचे काम माहे ऑगस्ट मध्ये सुरु करण्यात येवून समाधानकारक पूर्ण केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध शाळांमध्ये निकृष्ट दर्जाच्या देण्यात येत असलेल्या पोषण आहारामुळे विद्‍यार्थ्यांना होत असलेल्या विषबाधा**

**(२५) ४१६० (२२-१२-२०१४). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा देण्यात येत असलेल्या पोषण आहारामुळे विद्‍यार्थ्यांना विषबाधा होण्याचा घटनामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्‍यार्थ्यांना सकस व चांगल्या प्रतिचा पोषण आहार देण्याबाबत तसेच निकृष्ट दर्जाचा पोषण आहार देण्यास जबाबदार असणाऱ्या संबधितांवर कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१५) :** (१) व (२) शालेय पोषण आहारानंतर विद्‍यार्थ्यांना उलटी व मळमळ होणे अशा काही घटना घडलेल्या अहेत. या प्रकरणांमध्ये चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात आली आहे. काही प्रकरणामध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत अनुचित घटना घडून नयेत यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत संबंधितांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शहरी भागाध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब करुन तयार आहार पुरवठा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागवून संस्थांची निवड करण्यात आली आहे. तथापि मा.उच्च नयायालयामध्ये याविरोधात याचिका दाखल झालेल्या होत्या. सदर याचिकांवर शासनाच्या बाजूने निर्णय झालेला आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाने सदर योजनेमधून शिक्षकांचा सहभाग वगळण्याचे आदेश दिलेले आहे. शालेय पोषण आहार योजना शिक्षकांचे सहभागाशिवाय राबविणे अशक्य असल्याने शासनाने या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायलयात याचिका (SLP) दाखल केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मालेगाव (जि. नाशिक) येथे अलीगड मुस्लीम विद्‍यापीठाची शाखा सुरु करण्याबाबत**

**(२६) ४१६५ (२२-१२-२०१४). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि. नाशिक) येथे अलीगड मुस्लीम विद्‍यापीठाची शाखा सुरु करण्याबाबत संबंधितांनी सर्व्हे केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हे करुनही अद्यापही उक्त प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही संबंधितांनी केली नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालेगाव येथे उक्त विद्यापीठाच्या शाखा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०६-०४-२०१५) :** (१) होय,
(२) नाही,
(३) मालेगाव शहरापासून २४ कि.मी. अंतरावर चौधी, ता.मालेगाव येथील जागेची पाहणी केलेली असून सदरची जागा वनसंरक्षित क्षेत्र आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील अवसायानात निघालेली नागरी औद्योगिक बँकेतील कर्जदारांच्या रकमेवर व्याज न आकारणेबाबत

**(२७) ४१७३ (२२-१२-२०१४). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील अवसायानात निघालेल्या नागरी औद्योगिक बँकेचे कर्जदार हे बँक ज्यादिवशी अवसायानात निघाली त्यादिवशी पर्यंत कर्ज भरण्यात तयार असतांना देखीलही प्रशासनाकडून बँक अवसायानात निघालेल्या तारखेनंतर व्याज लावले असल्यामुळे कर्जदार पैसे भरण्यास तयार नाहीत या प्रकारामुळे ठेवीदारांच्या रक्कमा अडकून पडल्यामुळे कर्जदार पैसे भरण्यास तयार नसून या प्रकारामुळे ठेवीदारांच्या रक्कमा अडकून पडल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अवसायकाने बँक अवसायानात निघालेल्या दिनांकपर्यतचेच व्याज लावून इतर बँकाप्रमाणे पुढील व्याज न आकारण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१५) :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील नियम ९१ मधील तरतुदीनुसार अवसायानात निघालेल्या बँकेच्या ताळेबंदानुसार बँक अवसायानात निघाल्यानंतर बँकेच्या देणी रक्कमेवर व्याज आकारणी बंद होती. तथापी बँकेच्या ताळेबंदातील येणी रकमेवरील व्याज आकारणी बंद होत नाही. अवसायान प्रक्रीया सर्वसाधारणपणे ६ ते १० वर्ष एवढया कालावधीपर्यंत चालू असते. त्या कालावधीमध्ये कर्जावर व्याज आकारणी केली नाहीत तर १० वर्ष एवढया कालावधीपर्यंत चालू असते, त्या कालावधीमध्ये कर्जावर व्याज आकारणी नियमानुसार व कोर्टाच्या हुकूम नाम्यानुसार सुरु आहे.

बँकेस येणे रक्कम रु. ५०८७.९४ लाख इतकी असून अवसायन तारखेपासून दि. ३१/१२/२०१४ अखरे पर्यंत थकबाची येणेपैकी एकूण १९७६.३३ लाख वसूल करण्यात आले आहेत. मात्र कर्ज वसुलीस कर्जदारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने बँकेकडे निधीचा तुटवडा आहे त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत.
२) ३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील जेलच्या क्षमतेबाबत**

**(२८) ४१७५ (१५-०१-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील कारागृह ब्रिटीशकालीन असल्याने १४१ कैद्याची क्षमता असलेल्या कारागृहासाठी ५९ इतके कर्मचारी तैनात असणे परंतु २९७ कैदी जाणे, तसेच कारागृह परिसरात ५०० मिटर नविन बांधकामास शासनाने बंदी घातल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी केंगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या जागेत हालविणे बाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोद्यांना दिनांक १२/११/२०१४ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नासंबंधी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :** (१) होय,
(२), (३) व (४) याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झाला असून सदर बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**कर्जत तालुक्यातील खेड येथील पुणे व नगर जिल्ह्यांना जोडणारा पुल वापरासाठी धोकादायक बनल्याबाबत**

**(२९) ४२३५ (२४-१२-२०१४). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील खेड येथील पुणे व अहमदनगर या दोन जिल्ह्यांना जोडणारा पुल वाहतुकीसाठी धोकादायक झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलावरील रस्त्यावर खडे पडले असून साईड पट्या खचल्या आहेत व पुलाच्या बाजुस व भीमा नदी पात्रामध्ये वाळू उपसा झाल्याने पुलाचे बांधकाम खचले असून पुल कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खेर आहे काय,
(३) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नाधीन पुलावर व पाहोच मार्गावर काही ठिकाणी पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. तसेच पुलाच्या पाहोच मार्गाच्या काही ठिकाणी खचलेल्या साईड पट्टयांची दुरुस्ती करण्यात आली आहे. सदर पुलाच्या बाजूस व भीमा नदीपात्रात वाळू उपसा होत नाही, सद्यस्थितीत पूल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

---

**पुणे ते नगर राज्य महामार्ग क्र.६ वर वृक्ष लागवड करणेबाबत**

**(३०) ४२६९ (२३-१२-२०१४). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते नगर या राज्य महामार्ग क्र. ६ चे विस्तारीकरण झाल्यानंतर या महामार्गावर शासनाने कोणतेही वृक्षरोपण व लागवड केली नसून पूर्वीचे मोठे व घनदाट वृक्ष महामार्गाच्या विस्तारीकरण करण्यासाठी तोडण्यात व संपुर्ण काढून टाकण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) उक्त महामार्गावर विस्तारीकरण नंतर वृक्षरोपण न करण्याची कारणे काय आहेत,
(३) येरवडा ते वाधोली या भागामध्ये महामार्गावर दुतर्फा वृक्षरोपण करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
पुणे शिरुर रस्त्यावर कि.मी. १०/६०० ते ६४/०० दरम्यान १९५२ झाडे तोडण्यात आली व त्या बदल्यात ६२५० झाडे लावण्यात आली आहेत.
शिरुर अहमदनगर रस्त्यावर कि.मी. ६४/०० ते १२०/४०० दरम्यान २२६५ झाडे तोडण्यात आली व त्या बदल्यात ५११६० झाडे लावण्यात आली आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) येरवडा ते वाधोली या रस्त्याची लांबी पुणे महानगरपालिकेकडे आहे.

---

**वाशिम जिल्हयातील पोलीस चौक्याचे पोलीस स्टेशन मध्ये रुपांतर करणेबाबत.**

**(३१) ४२८६ (१५-०१-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील गोवर्धना, वाकद ता.रिसोड व मेडशी किन्नाजा ता.मालेगाव या पोलीस चौक्यांचे रुपांतर पोलीस स्टेशन मध्ये करण्याबाबत राज्य पोलीस दलातील दुसऱ्या टप्प्यामध्ये करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावर विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पोलीस चौक्या क्षेत्रातील वाढती गुन्हेगारी व अपराध लक्षात घेऊन याबाबत तत्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सततच्या मागणीनुसार पहिल्या टप्प्यामध्ये प्राधान्य देण्याचा शासन विचार करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :**(१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे प्रश्न अद्‌यापि प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ४२९४ (२२-१२-२०१४). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे प्रश्न (अंगणवाडी खाजगीकरण, ४ ते ५ महिने थकित ठेवत असलेले वेतन, खिचडीसाठी गॅस सिलेंडराचा पुरवठा न होणे इ.) आजपावेतो प्रलंबित असल्याने अंगणवाडी कर्मचारी युनियन आयटकतर्फे मागणी सप्ताह माहे २४ नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीसांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) अद्‌याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०३-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या मागण्यांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.
१) अंगणवाडयांचे खाजगीकरण करणेबाबत शासनस्तरावरुन कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
२) अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे थकित मानधन अदा करण्यासाठी शासनस्तरावरुन तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे व त्यानुसार प्रकल्पस्तरावरुन मानधन अदा करण्यात येत आहे.
३) खिचडीसाठी गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याची तरतूद नाही.
४) अंगणवाडयांच्या लाभार्थ्यांना स्थानिक महिला बचतगटांमार्फत THR व गरम ताजा आहार पुरविण्यात येतो. ज्या अंगणवाडयांना कच्चा शिधा पुरविण्यात त्या अंगणवाडयांच्या सेविका, मदतनीसांना प्रति लाभार्थी ०.५० प्रमाणे अनुदान देण्यात येते. या अनुदानाची रक्कम वित्तीय तरतूद उपलब्ध झाल्यानंतर प्रकल्पस्तरावरुन वितरीत करण्यात येते.

---

**तिवसा तालुक्यात (जि.अमरावती) शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांना बँकाद्वारे योग्य तो प्रतिसाद मिळ्त नसल्याबाबत**

**(३३) ४३१९ (२२-१२-२०१४). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा तालुक्यात (जि.अमरावती) राज्यशासनाद्वारे वृध्दाच्या मदतीकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांना बँकाद्वारे योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील यावली शहीद येथील देना बँकेकडून वयोवृध्दाची हेळसांड होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद येथील देना बँकेकडून वयोवृध्दांची हेळसांड होत असल्याबाबत ॲड.यशोमती ठाकूर (सोनवणे) (तिवसा), विधानसभा सदस्य यांचे स्वीय सहाय्यक यांनी माहे जुलै, २०१३ मध्ये तहसिलदार, अमरावती यांचेकडे दुरध्वनीवरुन तक्रार केली होती. सदर तक्रार तिवसा तालुक्यातील नसून अमरावती तालुक्याशी संबंधित आहे.

तद्नंतर देना बँक शाखेच्या अनियमित कारभाराबाबत ॲड.यशोमती ठाकूर (सोनवणे) (तिवसा), विधानसभा सदस्य यांची तक्रार जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालयाला माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये प्राप्त झाली होती.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अमरावती ग्रामीण येथील नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी यांनी देना बँक यावली शहीद येथे जाऊन दि.९ जुलै, २०१३ रोजी पंचनामा केला. सदर पंचनाम्याच्या वेळी संजय गांधी निराधार अनुदान योजना / श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना / इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेचे लाभार्थी उपस्थित होते. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी बँक खाते पुस्तकाच्या नोंदी अद्यावत करुन देत नाहीत, खाते बुक अद्यावत करुन देत नाहीत, खाते बुक अद्यावत करण्यासाठी मुख्य शाखा शिराळा येथे जावे लागते, लाभ मंजुरीची यादी बँक बाहेर प्रसिध्द करत नाही, त्यामुळे लाभ बँकेत जमा झाला किंवा नाही हे कळत नाही इ. तक्रारी केल्या.

सदर तक्रारी संदर्भात बँकेच्या कर्मचाऱ्यांशी नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी यांनी चर्चा केली असता त्यांनी २/३ दिवसात सर्व हस्तलिखीत खाते पुस्तिका संगणकीकृत करुन देण्याचे तसेच यावली (शहीद) येथेच शाखेमध्ये प्रिंटर उपलब्ध करुन देण्याचे बँकेच्या वरिष्ठ अधिका-यांनी मान्य केले तसेच लाभ मंजुरीची यादी बँकेच्या बाहेरील परिसरात प्रसिध्द करण्याचेही व नियमितपणे लाभार्थ्यांचे खाते पुस्तक अद्यावत करुन देण्याचे मान्य केले.

देना बँकेची यावली शहीद येथील शाखा भाडेपट्टी करारनामा संपल्यामुळे सद्यःस्थितीत बंद करण्यात आलेली आहे. आता यावली शहीद येथील लाभार्थ्यांना बँकेच्या शिराळा शाखेतून अनुदानाचे वाटप नियमितपणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**सातारा येथे मेडीकल कॉलेज उभारण्याबाबत**

**(३४) ४४२२ (२२-१२-२०१४). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे मेडीकल कॉलेज उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व साधारणत: उक्त ठिकाणी मेडीकल कॉलेज उभारण्याबाबत केंव्हा पर्यंत निर्णय होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२५-०३-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) सातारा येथील प्रस्तावित महाविद्यालयाचा प्रस्ताव भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) तालुक्यातील वसंतदादा पाटील रुग्णालय व महाविद्यालयास औषधे पुरवठा करण्याबाबत**

**(३५) ४४५५ (२३-१२-२०१४). श्री. धनंजय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय व शासकीय महाविद्यालय, येथे दिवसेदिवस रुग्णांची संख्या वाढत असून येथे अस्थिरोग, कान-नाक-घसा, नेत्र विभाग, प्रसुती विभाग, इत्यादी शस्त्रक्रिया होत असतात,त्याकरीता आवश्यक असणारी औषधे पुरेशा प्रमाणात खरेदी न केल्याने रुग्णाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय रुग्णालय व महाविद्यालयास औषधे पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) संस्थेसाठी वेळोवेळी प्रचलीत कार्यपध्दतीनुसार औषधे खरेदी करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा तालुक्यतील म्हैसाळ टप्पा क्र. ६ साठी निधीची तरतूद करण्याबाबत.**

**(३६) ४४७७ (२३-१२-२०१४). श्री. भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदतकार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा म्हैसाळच्या टप्पा क्र. ६ हा भाग दुष्काळी भागात समाविष्ठ असल्यामुळे दुष्काळी कामे, जनावरांना चारा तसेच पिण्याचे पाणी या सारख्या गंभीर समस्या भेडसावत आहेत, हे खरे आहे काय,

(२) अद्याप मंगळवेढा, जत या तालुक्यातील जलसेतूची कामे अपूर्ण असल्याने दुष्काळात अधिक भर पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) मंगळवेढा तालुक्यातील म्हैसाळ टप्पा क्र. ६ साठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय?

**श्री. एकनाथ खडसे (१८-०४-२०१५) :**(१) होय.

(२) व (३)

अंशतः खरे आहे. प्रकल्पाची कामे उर्ध्व बाजूपासून निम्न बाजूपर्यत निधीच्या उपलब्धतेनुसार व कामांच्या प्राधान्यक्रमानुसार केली जात आहेत. जत कालवा कि.मी. ६३ पर्यंत पाणी जाण्यासाठी कमान आवश्यक कामे पुर्ण झाली असून पाणी सोडण्यात आले आहे. मंगळवेढा तालुक्यास जत कालवा कि.मी. ६९ नंतर लाभ मिळतो. सद्यःस्थितीत कि.मी. ६६/००० ते ७२/००० मधील बहुतांश मातीकामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे निधीच्या उपलब्धतेनुसंर करण्याचे नियोजन आहे.

(४) कृष्णा कोयना उपसा सिंचना प्रकल्पाच्या सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातुन सोलापूर जिल्ह्यासाठी रु. ७००.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

---

**पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर)तालुक्यातील शेतकऱ्यांना पुर्ण क्षमतेने विद्युत पुरवठा होत नसल्याबाबत**

**(३७) ४४७८ (२२-१२-२०१४). श्री. भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना पुर्ण क्षमतेने विद्युत पुरवठा होत नसून जळालेले डी.पी. तीन ते चार आठवडे मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) इन्फ्रावन आणि टू योजनेंतर्गत ॲडीशनल ट्रान्सफार्मर मंजूर असूनसुध्दा कामे अतिशय मंद गतीने होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) पायाभूत सुविधा आराखडा-२ अंतर्गत मंजूर कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी मे. इलेक्ट्रोपाथ सर्व्हिसेस प्रा.लि. अंबेजोगाई यांचेकडे अधीक्षक अभियंता, सोलापूर, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा), बारामती परिमंडळ, तसेच महावितरण कंपनी, मुंबई येथे बैठक घेऊन ठेकेदारास कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच मुख्य अभियंता, बारामती परिमंडळ यांचा सातत्याने पाठपुरवा चालू आहे. महावितरण कंपनीने पंढरपूर विभागातील पायाभूत सुविधा आराखडा-२ मधील कामाची प्रगती सुधारण्यासाठी मे.इलेक्ट्रोपाथ सर्व्हिसेस प्रा.लि. यांना नोटीस (Notice to correct) दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन शहरातील नारायण पाखाडी येथील सुदर्शन वेश्वीकर यांच्या बंद घरातून चोरट्यांनी १० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याबाबत**

**(३८) ४६५८ (१५-०१-२०१५). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन शहरातील नारायण पाखाडी येथील सुदर्शन वेश्वीकर यांच्या बंद घरातून चोरट्यांनी १० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना नुकतीच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात मोठ्या प्रमाणात घरफोड्या सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१५) :**(१) होय.

(२) असे आढळून येत नाही.

(३) व (४) श्रीवर्धन पोलीस ठाणे कॉगुरनं.२६/२०१४ भादंविसं कलम ४५४,४५७,३८० अन्वये दिनांक २१.११.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदरचा गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीत निष्पन्न करुन गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

---

**अकोला येथील संत तुकाराम हॉस्पिटलची जीवनदायी योजनेअंतर्गत थकबाकी देणेबाबत.**

**(३९) ४६६४ (१५-०१-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील संत तुकाराम हॉस्पिटल यांनी जीवनदायी योजनेअंतर्गत केलेल्या उपचारांच्या रकमेची थकबाकी तातडीने द्यावी अशी मागणी उपसंचालक, आरोग्य विभाग,

अकोला, यांचेकडे दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या हॉस्पिटलचे सुमारे ५० लाख रुपये शासनाकडे मागील दिड वर्षापासून थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या हॉस्पिटलने आजपर्यंत ३२ स्मरणपत्रे पाठवुनही थकबाकीची पुर्तता करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :**(१) होय
(२) व (३) दि. १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी संत तुकाराम रुग्णालयाची रु. ६०.८६ लक्ष एवढी थकबाकी होती. त्यापैकी दि. १९.६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु. १०.९५ लक्ष व दि. ४.१०.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु. १०.०० लक्ष अशी एकूण रु. २०.९५ लक्ष एवढी रक्कम मंजूर केली आहे. आज दिनांकास सदर रुग्णालयाची रु. ३९.९१ लक्ष एवढी थकबाकी प्रलंबित आहे.
(४) सदर योजनेकरिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी केलेली तरतूद अत्यंत कमी असल्याने सदर रुग्णालयाची थकबाकी पूर्णपणे अदा करणे शक्य झालेले नाही. तरतूद उपलब्ध करुन देण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**राज्य आर.टी.ओ. दलालांकडून मुक्त करण्याबाबत**

**(४०) ४६८२ (२२-१२-२०१५). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व जिल्हयात राज्य परिवहन कार्यालयात (आर.टी.ओ.) दलालांचा सुळसुळाट झाला आहे, कोणतेही लहान मोठे कामे सरळ व सहज होत नाहीत. प्रत्येक कामासाठी दलालांचा हस्तक्षेप असतो व जनतेची पिळवणूक होत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास. सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. दिवाकर रावते (२०-४-२०१५) :**(१) व (२) राज्यातील परिवहन कार्यालयातील अनाधिकृत व्यक्तींच्या वावरास आळा घालण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत पहरपत्रके जारी करण्यात आली आहेत. तसेच पहरिवन कार्यालयात नागरिकास त्याच्या कामासाठी अनधिकृत व्यक्तीकडे जाण्याची गरज पडूनये या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये मार्गदर्शना कक्ष, एक खिडकी योजना, संकेत स्थळावर भेटीची वेळ घेणे व आवेदनपत्रे भरणे व कार्यपध्दतीची माहिती व कार्यालयात लावलेल्या माहिती फलकांचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाजवळ इयत्ता १० वी, १२ वी च्या परीक्षा घेण्यास निधी नसल्याने मंडळाने ठेवी मोडून परीक्षेचा खर्च भागविला असल्याबाबत**

**(४१) ४६९२ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ. आशिष देशमुख (काटोल), श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाजवळ इयत्ता १० वी, १२ वी च्या परीक्षा घेण्यास निधी नसल्याने मंडळाने ठेवी मोडून परीक्षेचा खर्च भागविला, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुस्तकांचा निर्मिती खर्च परवडत नसल्याचे कारण देऊन बालभारतीने पुस्तकांच्या किंमती (दर) वाढविल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंडळाजवळ निधी नसताना मात्र राज्य परीक्षा मंडळ व शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना परदेशात सिंगापूर येथे पाठविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने प्रश्न भाग (१) (२) व (३) बाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) अंशतः खरे आहे. सिंगापूर देशाने नवनवीन उपााययोजना करुन शिक्षण क्षेत्रामध्ये केलेल्या अभूतपूर्व प्रगतीचा अभ्यास करुन राज्यातील शालेय विद्यार्थ्याचया शिक्षणाच गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनातर्फे अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. या दौ-याकरीता निवड करयात आलेल्या अधिका-यांनी दौ-याच्या एकूण खर्चाचा १/४ किंवा रुपये १०,००० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा खर्च करणे आवश्यक होते. अभ्यासदौ-यासाठी आलेला उर्वरित खर्च राज्यमंडळ आणि बालभारती या स्वायत्त संस्थांनी आपलया निधीतून समप्रमाणात केलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलिसांवरील कामाचा त्रास कमी करण्याबाबत.**

**(४२) ४७३३ (२३-१२-२०१४). श्री. दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलिसांना बंदोबस्तांची कामे देऊ नका व त्यांच्यावरील कामाचा त्रास कमी करावा आणि पोलीस दलाचे कायदा सुव्यवस्था राखणारा व गुन्ह्याचा तपास करणारा असे विभाजन करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-४-२०१५) :** (१) होय.

मा.उच्च न्यायालयाने क्रिमीनल पी.आ.एल.क्र ४१/२०११ मध्ये दि. १६ सप्टेंबर, २०१४ रोजी निर्देश दिले आहेत.

(२) व (३) प्रकाशसिंग प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (दिवाणी) क्रमांक - ३१०/१९९६ मध्ये दिनांक २२ सप्टेंबर, २००६ रोजी दिलेलया निकालानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये सुधारणा केली असून महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४ हा दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून अंमलात आहे.

सदर अधिनियमातील कलम - २२ ओ. (१) व (२) नुसार अन्वेषण पोलीस आणि कायदा व सुव्यवस्था पोलीस यांचे विलगीकरण करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

---

## उस्मानाबाद जिल्हयात सन २०१३ मध्ये साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांधची १३३ कामे मंजूर केल्याबाबत

**(४३) ४८२३ (२२-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात सन २०१३ मध्ये साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांधची १३३ कामे मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यापैकी आतापर्यत किती कामे पूर्ण करण्यात आली आहे

(३) असल्यास, उर्वरित कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, व ती केव्हा पूर्ण करण्यात येतील ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-०४-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम राज्यस्तर निधीतून ५६ कामे व मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ९८ असे एकूण १५४ सिमेंट बंधारे मंजूर करण्यात आले आहेत.

(२) साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम राज्यस्तर निधीतून २५ कामे व मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ३३ कामे असे एकूण ५८ सिमेंट बंधारे पूर्ण केले आहेत.

(३) प्रगती पथावरील ६५ कामे मार्च २०१५ अखरे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित ३१ कामे अद्याप सुरु झालेली नाहीत. सदर कामे लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यात स्वतंत्र अभियांत्रिकी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी नेमलेल्या शिक्षण तज्ञांच्या समितीचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ४८५० (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वतंत्र अभियांत्रिकी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने नेमलेल्या शिक्षण तज्ञांच्या समितीचा अहवाल गेल्या तीन वर्षापासून शासनाकडे कार्यवाही विना प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एचटीईडी-११०३० (११)/१/२०१३-एमएचटी-(टीई-२) दिनांक ३१ जानेवारी, २०१४ अन्वये डॉ.बाबसाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांना राज्यातील इतर महाविद्यालये संलग्नीत करावयाचे अधिकार प्रदान करुन या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर निर्धारीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भात विद्यापीठाच्या सुधारीत कायद्यास विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच सदर कायद्याच्या मसुद्यास मा.राज्यपालांनी मान्यता दिलेली आहे.

(३) लागू नाही.

---

**राज्यातील मोहफुलावरील बंदी उठविण्याबाबत**

**(४५) ४८५६ (२२-१२-२०१४). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोहफुलावरील खरेदी, विक्री तथा साठा करणे हे कायद्याने गुन्हा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहफुल हे आदिवासीचे पारंपारिक खाद्य असून बंदीमुळे आदिवासीचे आर्थिक नुकसान होते तसेच मोहफुलापासून केवळ दारुच बनते असा अपप्रचार केल्यामुळे यावर शासनाची बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच काजूच्या फुलावरुन (बोंडांपासून) आणि मोहफुलापासून विविध पदार्थ किंवा खाद्य पदार्थ बनविले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच गोवामध्ये काजूच्या बोंडावरून म्हणजेच फुलावरुन विविध प्रक्रीया उद्योग आहेत त्यामुळे गोवा राज्यात मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होतो, हे ही खरे आहे काय,

(५) मोहफुलांवरील बंदी हटवून राज्यात विविध प्रक्रीया उद्योग उभारणार असल्यास आदिवासीचे रोजगार उपलब्ध होईल काय याबाबत शासनाची भूमिका काय याविषयी गडचिरोली जिल्ह्यात उद्योग निर्माण व्हावे, याविषयी उपाययोजना केली आहे काय, असल्यास कोणती उपाययोजना केली आहे काय?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०४-२०१५) :** (१) व (२) मुंबई दारुबंदी कायद्या १९४९ चे कलम ६०(२) मधील तरतुदीनुसार मोहाफुले बाळगणे, वाहतुक करणे, विक्री करणे इत्यादीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग अनुज्ञप्ती मंजूर करते.

(३) होय.

(४) हे खरे आहे. तथापि, गोवा राज्यात काजू बोंडापासून बनणा-या मद्यापासून (फेणी) गोवा राज्यात वार्षिक रु. ३५ लाख एवढे उत्पादन शुल्क प्राप्त होते. काजूबोंडापासून तयार करण्यात येणा-या खाद्य पदार्थावर उत्पादन शुल्क आकारणे ही बाब केंद्रीय उत्पादन शुल्क खात्याशी संबंधित आहे.

(५) गडचिरोली जिल्ह्यात मद्य बाळगणे, विक्री करणे व प्राशन करणे इत्यादींसाठी शासनाने बंदी घातलेली आहे. आदिवासींना दि. १६ फेब्रुवारी ते ३० सप्टेंबर या कालावधीत पुर्ण गडचिरोली जिल्ह्यात मोहाफुले बाळगणे, खरेदी- विक्री करणे व वाहतुक करणे यासाठी कोणतेही बंधन नाही. तसेच गडचिरोली वनवृत्तात मोहफुलापासून आदिवासींना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून संकलन व प्रक्रिया केंद्र गडचिरोली येथे उभारण्यास आलेले आहे. या केंद्रात गोळा करण्यात आलेल्या मोहफुलापासून शरबत जमा इत्यादी पदार्थ तयार करुन त्याचे विपणन केले जात आहे.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील “गोंडवाना विद्यापीठ” मध्ये झालेल्या अवैध नोकर भरतीबाबत**

**(४६) ४८६५ (२२-१२-२०१४). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठामध्ये पात्र बिंदू नामावली व रोस्टरप्रमाणे वर्ग २ व ३ आणि वर्ग ४ मध्ये भरती झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तथापी मुख्य परीक्षा नियंत्रण यांची पदे व इतर वर्ग २, ३ आणि वर्ग ४ ची पदे भरतानाही बिंदूनामावली व रोस्टरप्रमाणे पदे भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबत शासनाची भुमिका काय आहे?

**श्री. विनोद तावडे (०८-०४-२०१५) :**(१) होय.

(२) विद्यापीठातील परीक्षा नियंत्रक हे पद एकाकी असून हे पद संवैधानिक आहे. तसेच गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील वर्ग २, ३ व ४ ची पदे बिंदुनामावली व रोस्टर प्रमाणे भरण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील “गोंडवाना विद्यापीठ” समस्या बाबत**

**(४७) ४८६८ (२२-१२-२०१४). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात स्थापन झालेल्या गोंडवाना विद्यापीठाच्या पदवी विभागाकरीत खाजगी वा शासकिय जागेची आवश्यकता असून सदरील विद्यापीठाकरीता रेगुलर कुलगुरु, विद्वत व्यवस्थापक समिती, विद्यापीठ वस्तीगृह इ. स्वतंत्रपणे असण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गडचिरोली जिल्हयातील मॉडेल कॉलेज विद्यापीठामार्फत मंजूर झाले आहे, ही खरे आहे काय,

(३) प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०३-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, गडचिरोली येथे मॉडेल कॉलेज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर मार्फत मंजूर झाले आहे.

(३) गोंडवाना विद्यापीठाच्या विविध विभागाकरिता ४० एकर खाजगी जमीन हस्तांततरणाची कार्यवाही जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या मार्फत सुरु आहे या करिता शासनाकडून रु. १.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. विद्यापीठातील वसतीगृहाचे बांधकाम प्रगती पथावर असुन विद्यापीठाकरिता नियमित कुलगुरुंची निवड व व्यवस्थापन समितीने गठन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागातील जिल्हा परिषद, जिल्हा सेवा व जिल्हा**
**तांत्रिक सेवा-३ च्या कर्मचारी पदोन्नतीबाबत**

**(४८) ४८८२ (२२-१२-२०१४). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील वर्ग - ३ च्या पदोन्नत्या मागील ४ वर्षापासून प्रलंबीत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील जिल्हा परिषद, जिल्हा सेवा व जिल्हा तांत्रिक सेवा-३ च्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता डावलुन गट- ब मध्ये कनिष्ठ सेवा कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणची शासनाने चौकशी केली आहे, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) तसेच, सेवा जेष्ठता डावलून पदोन्नती पासुन वंचीत कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०३-२०१५)** :(१) व (२) अंशतः खरे आहे. सन २०१२ मध्ये अमरावती विभागाचा म.वि.से.गट- ब मधील पदोन्नतीचा प्रस्ताव शासन स्तरावर तपासताना जिल्हा परिषदेकडील जिल्हा सेवा व जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग -३ मधील कर्मचा-यांच्या सन २०००-२००९ अखरेच्या विभागीय स्तरावरील सेवाजेष्ठता चुकीच्या झाल्याची बाब निदर्शनास आल्यापासून तेथील पदोन्नती प्रक्रिया प्रलंबित आहे.

(३) जिल्हा परिषदेकडील जिल्हा सेवा व जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ मधील कर्मचा-यांच्या सन २०००-२००९ अखरेच्या विभागीय स्तरावरील सेवाजेष्ठता चुकीच्या झाल्याची बाब निदर्शनास आल्या नंतर सदर प्रकरणी दोषी असणा-या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(४) जिल्हा परिषदेकडील चुकीची सेवाजेष्ठता सुधारीत करण्यात आली असून त्यानुसार संबंधित कालावधीतील पदोन्नतीच्या निवडसूच्या सुधारित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर प्रक्रियेस काही कालावधी लागणार असल्याने सद्यस्थितीत अमरावती विभागात रिक्त असणारी पदे पदोन्नतीने भरयाबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक २३.२.२०१५ रोजी झाली असून प्रस्तावास शासन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील तालुका क्रीडा अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(४९) ४८८६ (२२-१२-२०१४). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया अतंर्गत येणाऱ्या १३ तालुक्यामध्ये मेहकर वगळता इतर १२ तालुका क्रीडा अधिकारी हे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातील शालेय खेळाडूंची गैरसोय होत आहे याची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१५)** :(१),(२) व (३) राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार निर्माण करण्यात आलेल्या तालुका क्रीडा अधिकाऱ्यांच्या एकूण ३१ पदांपैकी बुलढाणा जिल्ह्यासाठी तालुका क्रीडा अधिकाऱ्याचे फक्त एक पद मंजूर असून ते पद भरलेले आहे.

राज्याचे क्रीडा धोरण-२००२ अंतर्गत क्रीडा विभागाच्या सक्षमीकरणासाठी तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची ६९ नवीन पदे निर्माण करण्याचा निर्णय दिनांक २२.०१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला असून त्यानुसार सदर पदे भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**तेलवडी गावातील (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीबाबत**

**(५०) ४८९६ (७-१-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलवडी गावातील (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) परिसर हा डोंगराळ भाग असून तेथील रस्ता नसल्याकारणाने स्थानिक रहिवाशी, प्रवासी यांची गैरसोय होेत असल्यामुळे तेथील स्थानिकांनी अधिक्षक अभियंता, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी यांच्याकडे ६०० मीटर रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-३-२०१५) :** (१) होय.

(प्रश्नातील गाव तेलवडे नसून केळवडे असा आहे.)

(२) व (३) विषयांकीत रस्ता ग्रमीण मार्ग १२ असून एकूण लांबी ९.१०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याची कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.रत्नागिरी यांच्या मार्फत पहाणी करण्यात आली आहे.

सदर रस्त्याच्या कि.मी. ०/५७५ ते ०/८५० मध्ये रक्कम रु. ५.०० लक्ष किंमतीचे डांबरी नुतनीकरणाचे काम गट-ब-११ सन २०१४-१५ अंतर्गत मंजूर आहे. तसेच कि.मी. ४/९५० ते ५/५५० मधील डांबरी नुतरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याचे नियापेजन आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.